ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ ३२ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख २६ नोव्हेंबर, १९५२ अंक ४९

## विविध माहिती

**मालमत्तेवाले गरीब झाले**—१९५१ सालीं ब्रिटनमध्यें ऑक्टोबरांत सार्वत्रिक निवडणुकी झाल्या. त्यानंतर ब्रिटनमधील सरकारी रोख्याच्या आणि भागांच्या किंमती १८ टक्क्यांनीं घटल्या आहेत. शेअर्सच्या किंमतीहि अशाच खालीं गेल्या आहेत. त्यामुळें ब्रिटनमध्यें कांहीं थोडे लोक अजूनहि संपन्न दिसत असले तरी तुलनेने ते गरीबच झालेले आहेत, असें मत व्यक्त करण्यांत येत आहे.

**निझामानें कर्जें दिलीं**—निझामानें आपल्या राज्यांतील कांहीं कारखानदारांना कर्जें दिलीं असल्याचें समजतें. त्याशिवाय भारतीय सरकारच्या कर्जरोख्यांतहि निझामानें २० कोटी रुपये गुंतविले आहेत.

**सीलोन-अमेरिका करार**—अमेरिकेच्या फुलब्राइट कायद्यान्वयें उभय देशांत एकमेकांनीं विद्यार्थी पाठविण्याचा एक करार करण्यांत आला आहे. कराराप्रमाणें विद्यार्थ्यांच्या देवघेवीसाठी १६,५०,००० रुपये खर्च करण्यांत येणार आहेत.

**मौल्यवान् ऐतिहासिक दस्तऐवज**—जर्मनीच्या परराष्ट्रीय धोरणाची दिशा दाखवून देणारा एक दस्तऐवज फ्रेडरिक दि ग्रेटनें तयार केला होता. तो कागद अमेरिकेच्या ताब्यांत् होता. अमेरिकेनें आतां तो परत जर्मनीला दिला आहे. दस्तऐवजांत ५२ हजार शब्द असून तो फ्रेंच भाषेंत लिहिलेला आहे.

**वेड्या आशेची किंमत**—उत्तर प्रदेशांतील मॅट्रिक झालेल्या एका तरुणानें रेल्वे खात्यांत नौकरी मिळण्यासाठी एकूण १८ अर्ज केले. सर्व अर्जांना नकाराचीं उत्तरें आलीं. अर्ज करण्याचे अधिकृत फॉर्म्स वगैरेसाठी त्याला ३४ रुपये खर्च आला. त्याच्यावर आई आणि दोन बहिणी अवलंबून असल्यानें शिक्षण सोडून तो नौकरीची खटपट करीत होता.

**पूर्व जर्मनी युद्धनौका बांधणार**—पूर्व-जर्मनीमधील रशिअन अधिकाऱ्यांनीं पूर्व जर्मनीच्या सरकारला युद्धनौका बांधण्याची परवानगी दिली आहे, असें समजतें. ह्या परवानगीप्रमाणें बाल्टिक समुद्रामधील बंदरांतून युद्धनौका बांधण्याच्या कामास लवकरच प्रारंभ होईल.

**प्राणिसंग्रहालय आणि खाटकांचा संप**—कलकत्ता येथील खाटकांनीं नुकताच संप पुकारला होता. त्यामुळें आलिपूरच्या प्राणिसंग्रहालयांतील ५ सिंह, १० वाघ व ३३ इतर जनावरांना मिळणाऱ्या मांसाच्या शिध्यांत कपात करावी लागली. संप टिकल्यास कांहीं प्राण्यांचा निकाल लावण्याची भाषाहि सुरू झाली होती.

**उज्जैन-इंदूर लोहमार्ग**—उज्जैनपासून इंदूरपर्यंत रुंद रुळाचा रेल्वे रस्ता बांधण्याचें भारत सरकारनें ठरविलें असल्याचें समजतें. हा मार्ग महूपर्यंत बांधण्यांत येण्याचाहि संभव आहे. ह्या कामासाठी ४० लक्ष रुपये खर्च करण्यांत येतील. रेल्वे रस्ता पुरा होण्यास दोन वर्षें लागतील.

**सार्वत्रिक निवडणुकीचा खर्च**—भारतांत झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी भारत सरकार व राज्य सरकारें ह्यांना मिळून ९·२५ कोटी रुपये खर्च आला, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. उमेदवारांकडून घेण्यांत आलेली फी आणि जप्त झालेल्या अनामत रकमा मिळून सरकारला २२ लाख रुपये मिळाले.

**नेपाळमधील विमानमार्ग**—नेपाळमधील एक अंतर्गत विमानमार्ग नुकताच सुरू करण्यांत आला. नेपाळची राजधानी काटमांडू येथून विराटनगर व सिमला येथें विमानें जातील. हा विमानमार्ग हिमालयन एव्हिएशन ही भारतीय कंपनी चालविणार आहे.

**उत्तर प्रदेशांतील ग्रामोद्योग**—उत्तर प्रदेश सरकारनें राज्याच्या पूर्वभागांत बरेच ग्रामोद्योग काढण्याचें ठरविलें आहे. ह्या योजनेसाठी ७२ लाख रुपये खर्च येईल. राज्याच्या पूर्व भागांत दुष्काळ आणि जलप्रलय वारंवार होत असल्यानें ह्या भागाकडे पंचवार्षिक कार्यक्रमांत विशेष लक्ष पुरविण्यांत आलें आहे.

**मदुरेला विमानें जाणार**—एअर इंडिआ कंपनीच्या मद्रास-त्रिवेंद्रम् ह्या मार्गाचा अधिक विस्तार करून विमानें मदुरा व त्रिचनापल्ली येथेंहि नेलीं जाण्यांत येणार असल्याचें समजतें. ही योजना बहुधा पुढील महिन्यापासून अंमलांत आणली जाईल.

**९ महिन्यांत १७,५०० परकीय प्रवासी**—जानेवारी ते सप्टेंबर, १९५२ ह्या ९ महिन्यांच्या कालांत भारतांत १७,५०० परदेशीय प्रवासी आले. त्यांपैकीं ३,००० अमेरिकन नागरिक होते. १९५१ सालीं सुमारें २०,००० परकीय प्रवाशांनीं भारताला भेट दिली होती. त्यांपैकी ३,५०० अमेरिकन होते. १९५१ सालीं अमेरिकन प्रवाशांच्या आगमनामुळें भारताला १ कोटी रुपयांचे डॉलर्स मिळाले होते.

**भारतासाठी जपानी बोट**—जपानमधील एका गोदींत भारतासाठी ११,००० टनांची एक मालवाहू बोट बांधण्यांत येत आहे. बोट जानेवारी, १९५३ मध्यें बांधून पुरी होईल आणि नंतर ती जपान-भारत-पाकिस्तान मार्गावर मालाची नेआण करण्यासाठी वापरली जाईल.

# श्री भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

अधिकृत मांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें मांडवल रु. ७,९३,८१०
वसूल मांडवल रु. ४,००,०००

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि सांगली बँक लिमिटेड

सांगली

(स्थापना १९१६ : शेडयूल्ड बँक)

मुख्य ऑफिस : सांगली

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये १०,००,००० |
| वसूल मांडवल | रुपये ४,५०,००० |
| रिझर्व व फंडस् | रुपये ४,५०,००० |
| वर्किंग फंडस् | रुपये एक कोटी |

: शाखा :

मुंबई, शहापूर, तेरदळ, रबकवी, शिरहट्टी, मंगळवेढें, कवठें, कराड, उगार, विलिंग्डन कॉलेज.

सांगली येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. एस्. ई. सुखटणकर, D. F. C., I. A. S. (चेअरमन) कलेक्टर, साउथ सातारा.

(१) श्री. नेमचंद रावजी शहा (२) श्री. भूपालराव अनंत आरवाडे (३) श्री. पुरुषोत्तम गोकुळदास, (४) श्री. गुंडप्पा बाबाजी आरवाडे, (५) श्री. शांतीनाथ बाबुराव आरवाडे, B. A., (६) श्री. मारुतीराव रामचंद्र जाधव.

एम्. के. गुप्ते,
एम्. ए., सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

—पुणें शहर—
लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

भोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जे देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जे देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षे मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षे २॥ टक्के, ५ वर्षे ३ टक्के, ७ वर्षे ३॥ टक्के, १० वर्षे ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्यासेरिज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रबडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन

१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.

# वेस्टर्न इंडिया

विमा कंपनीनें

आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा

यासंबंधींची प्रचिती पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

दर हजारी त्रैवार्षिक बोनस

| इयातींतील पॉलिसी | इयातीनंतरची पॉलिसी |
|---|---|
| रु. २७ | रु. ३३ |

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठी वेस्टर्न इंडियाची निवड करा.

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.
मॅनेजर

# वेस्टर्न इंडिया लाईफ

इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.

शाखा कचेरीः— शहर: १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें. कँप: केअर-ऑफ क्रेसवेल्स ईस्ट स्ट्रीट, पुणें-१

फोन नंबर— ३४०२

# अर्थ

बुधवार, ता. २६ नोव्हेंबर, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## साखर कारखानदारांपुढील प्रश्न

डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशनची १३ वी वार्षिक सभा नुकतीच भरली होती. त्यावेळीं असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. गुलाबचंद हिराचंद ह्यांनीं आपल्या भाषणांत हिंदी साखर धंद्याचा आणि विशेषतः महाराष्ट्रांतील साखर धंद्याचा उत्कृष्ट आढावा घेतला. गेल्या वर्षी हिंदी कारखान्यांनीं १५ लक्षापेक्षा जास्त टन साखर उत्पादन केली, त्यामुळें ५ लक्ष टन साखर जरूरीपेक्षा जास्त पैदा झाली आहे. महाराष्ट्रांतील कारखान्यांनीं ३०% जास्त उत्पादन करून नवा विक्रम केला. जादा साखरेच्या उठावासाठी एक्साइज पट्टींतील रिबेटखेरीज मध्यवर्ती सरकारनें कोणताहि प्रयत्न केला नाहीं. नव्या बाजारपेठा काबीज करतां याव्यात, ह्यासाठी उसाच्या किंमतींत कांहीं उतारास परवानगी असावी, ही कारखानदारांची मागणी सरकारनें मान्य केली नाहीं. उ. प्रदेश राज्यानें ही सूचना फेटाळली आणि मध्यवर्ती सरकारला विरोधापुढें नमावें लागलें.

साखर कारखान्यांनींच त्यांना लागणारा ऊंस स्वतः पिकविणें श्रेयस्कर आहे, हें तत्त्व मान्य करण्यांत आलें आहे आणि महाराष्ट्रांतील कारखान्यांचें तर तें एक वैशिष्ट्य आहे. परंतु त्याचा फायदा होण्याऐवजी तोटाच अनुभवास येऊं लागला असल्याचें श्री. गुलाबचंद ह्यांनीं प्रतिपादलें आहे. उसाच्या किंमतींत आतां घट करण्यांत आली आहे, तिचेमुळें मुंबई राज्याबाहेरील कारखान्यांच्या अडचणी वाढलेल्या नाहींत. परंतु, महाराष्ट्रांतील कारखानदारांस हा प्रश्न फार जिव्हाळ्याचा आहे. उसाच्या किंमतींत घट करणें अटळ होतें, परंतु ती घट सरकारनें हळुहळु घडवून आणली असती तर बरें झालें असतें, असें त्यांनीं सांगितलें आहे. महाराष्ट्रांतील कारखानदारांनीं आतां उसाच्या उत्पादनाच्या खर्चांत बचत केली पाहिजे आणि सरकारनें ठरवून दिलेल्या किंमतीच्या चौकटींत तो खर्च आणवून ठेवला पाहिजे. दरएकरीं उत्पादन वाढविण्याचे मार्गांत इतर कांहीं कारणांबरोबर सरकारी कालव्यांपासून पाण्याचा होणारा अपुरा पुरवठा हेंहि एक महत्त्वाचें कारण सांगण्यांत येतें. दर एकरीं मिळणारें पाणी अपुरें असल्यानें उसाचें पीक यावें तितकें फलदायी होत नाहीं अशी कारखानदारांची तक्रार आहे. कालव्याच्या पाण्याच्या वाढलेल्या पट्टीविरुद्धहि त्यांची तक्रार आहे. दर टन उसामागें ३ रु. ८ आ. इतकी सरकारी पाणीपट्टी बसते, असा हिशेब करण्यांत आला आहे.

महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांचा उत्पादन खर्च सरकारनें ठरवून दिलेल्या किंमतीचे हिशेबाचे आंत व्हावयाचा असेल, तर तेथील शेती विभागांतील कामगारांचा रोजगार कमी करण्यांत आला पाहिजे, असें कारखानदारांचें म्हणणें आहे. मुंबई राज्यांत शेतकाम करणारांपैकीं १% सुद्धा उसाच्या शेतकामांत गुंतलेले नाहींत. त्याचप्रमाणें राज्यांतील उसापैकी एक दशांश ऊससुद्धा कारखाने स्वतः करीत नाहींत. तेव्हां, कारखान्यांच्या ताब्यांतील शेतीविभागांतील कामगारांचीच तेवढी रहाणी उच्च राखण्याचा सरकारनें अट्टाहास कां बाळगावा? बॉंबे इंडस्ट्रिअल रिलेशन्स ॲक्ट शेतीच्या ह्या लहानशा विभागाला सरकारनें लागू करून कारखानदारांवर अन्याय केला आहे, अशी त्यांची तक्रार आहे. २०,००० एकरांची सलग लागवड एकाद्यानें केली तरी हा कायदा लागू होत नाहीं, पण तुम्हीं साखर तयार केली आणि त्याचवेळीं कारखान्यासाठी तुम्हीं ५ एकर जरी ऊंस लावला, तरी ह्या कायद्याचीं सर्व कलमें तुम्हीं पाळलीं पाहिजेत असा प्रकार आहे. स्वतःला लागणारा ऊंस कारखानदारांनीं स्वतः लावणें, हा मोठा गुन्हाच झाला आहे. उसाची किंमत आतां उतरली असल्यानें, ह्या कायद्यांतून मुक्तता होण्याचा प्रयत्न डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशन कसून करणार आहे. कारखान्यांचें अस्तित्व आणि ६०,००० कामगारांना रोजगार पुरविण्याचें त्यांचें सामर्थ्य ह्यांस धोका प्राप्त व्हावयाचा नसेल, तर बी. आय. आर. कायद्याचा जाचकपणा नष्ट व्हावयास पाहिजे, असा कारखानदारांचा आग्रह आहे.

दरमणी ३ आण्यांचा शुगरकेन सेस हल्लीं गोळा केला जातो, त्याचा बोजा उसावर दरमणी १४ ते १५% पडतो. ही पट्टी दरमणी ½ आणा एवढीच असावी आणि निर्गत होणाऱ्या साखरेच्या बाबतींत तर पट्टी मुळींच घेण्यांत येऊं नये, असें श्री. गुलाबचंद ह्यांनीं सुचविलें आहे. म्हणजे, दर टनी ५० रु. एवढी निर्गतीस मदत होईल. जादा उत्पन्नाचा उठाव त्यामुळें होऊं शकेल आणि मौल्यवान परदेशी हुंडणावळहि मिळूं शकेल.

साखर कारखान्यांनीं ३ लक्ष टन साखरेचा साठा वर्षभर राखावा म्हणजे पुरवठा सतत चालू रहाण्यास मदत होईल हें नवें सरकारी धोरण महाराष्ट्रांतील कारखानदारांच्या सोईचें नाहीं. उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल, पंजाब, इत्यादि ठिकाणीं उसाच्या लागवडीमध्यें कारखानदारांना मोठाल्या रकमा गुंतवून ठेवाव्या लागत नाहींत. ऊंस प्रत्यक्ष विकत घेतल्यावरच त्याची किंमत ते देतात. म्हणजे, त्यांचे पैसे थोडा वेळच गुंतून रहातात. महाराष्ट्रांतील कारखानदारांना मात्र जवळ जवळ दोन उभ्या पिकांचा खर्च करावा लागतो, आणि त्यांत लक्षावधि रुपये अडकून पडतात. त्यांतच साखरेचे साठेहि बाळगण्याची कायदेशीर जबाबदारी त्यांच्यावर टाकली, तर त्यासाठी मोठाल्या रकमा अडकवून ठेवाव्या लागतील आणि त्यांच्या व्याजामुळें उत्पादन खर्चहि वाढेल. महाराष्ट्रांतील कारखान्यांना त्यांच्या साखरेचे पैसे त्वरित हातीं यावें, अशी तरतूद होणें अगत्याचें आहे.

---

### श्री. वैकुंठराय मेहता

श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिटयूटचे उपाध्यक्ष म्हणून काम करण्यास संमति दिली असून, त्या जागीं त्यांची निवड झाली आहे. सर जनार्दन मदन हे इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष आहेत.

## मुंबई राज्याच्या जनतेचें उत्पन्न

मुंबई सरकारच्या ब्यूरो ऑफ इकॉनॉमिक्स अँड स्टॅटिस्टिक्सतर्फे मुंबई राज्यांतील जनतेच्या १९५०–५१ सालांतील उत्पन्नाचा अंदाज ९२४·४३ कोटी रुपये करण्यांत आला आहे. राज्याची लोकसंख्या ३५९·६ लाख आहे. म्हणजे, उत्पन्नाची दरडोई सरासरी २५७·०७ रुपये पडते. एकूण उत्पन्नापैकी ४२·४७ टक्के उत्पन्न शेती, पशुसंगोपन, मासेमारी, खाणी व मिठागरें ह्या धंद्यांत गुंतलेल्या लोकांनीं मिळविलेलें होतें. संघटित धंद्यांपासून झालेल्या उत्पन्नाचा आंकडा १४३·२२ कोटी रुपये अथवा एकूण उत्पन्नाच्या १५·५१ टक्के इतका आहे. दुकानें व व्यापारी संस्था ह्यांच्यापासून १६४·०५ कोटी रुपये उत्पन्न झालें. एकूण उत्पन्नाच्या १७·१७ टक्के असें हें प्रमाण पडतें. राज्यांतील वहातुकीच्या व दळणवळणाच्या साधनांपासून ४१·०५ कोटी रुपये, सरकारी नोकरीपासून ५०·५३ कोटी रु., मालमत्तेपासून ४७·२५ कोटी रु. असे उत्पन्नाचे आंकडे देण्यांत आले आहेत. राज्यांतील शिक्षकांनी ४·२३ कोटी रुपये मिळविल्याचे नमूद करण्यांत आलें आहे.

एकूण उत्पन्नापैकीं ४० टक्के उत्पन्न पगार व रोजगार ह्यांच्यापासून झालें असून ६० टक्के उत्पन्न औद्योगिक व इतर प्रकारचे नफे आणि जमीनदारांचें उत्पन्न ह्यापासून झालें आहे. निरनिराळया प्रकारच्या आर्थिक व्यवहारांत जी सरासरी प्राप्ति होते त्यांत वकिलांची सरासरी प्राप्ति सर्वांपेक्षा अधिक असल्याचें आढळून आलें आहे. ही सरासरी वार्षिक ४,०८९ रुपये इतकी आहे. त्यानंतर वैद्यकीय व्यवसायाच्या प्राप्तीच्या सरासरीचा अनुक्रम लागतो. ही सरासरी वार्षिक ४,०२९ रुपये इतकी आहे. त्यानंतर विमानविषयक व्यवसायांत गुंतलेल्या लोकांचा अनुक्रम लागतो. त्यांना सरासरी ३,३०६ रुपयांची प्राप्ति झाली. विद्यापीठांतील अध्यापकांच्या उत्पन्नाची सरासरी ३,२६० रुपये आहे. प्राथमिक शिक्षकाच्या उत्पन्नाची सरासरी १,१८५ रुपये असून माध्यमिक शिक्षकाच्या उत्पन्नाची सरासरी १,५८६ रुपये आहे.

राज्यांत ३,३५,९६,००० एकर जमिनींत लागवड करण्यांत आली. ह्या लागवडींत अन्नधान्यें आणि रोखीचीं पिकें अशा दोन्ही प्रकारच्या पिकांचा समावेश होतो. एकूण उत्पादन ५,८०,४३,००० टन झालें. ह्या सर्व पिकांची किंमत सुमारें २८०·२६ कोटी रुपये झाली. १९४९–५० सालीं राज्यांत उत्पादन ६८,९६,००० टन झालें होतें. त्याची किंमत २८२·४६ रुपये धरण्यांत आली होती. मुंबई राज्यांत १९४९–५० सालीं ६२·६८ कोटी रुपये किंमतीचें दूध उत्पादन करण्यांत आलें होतें; १९५०–५१ सालीं सुमारें ७९·०३ कोटी रुपये किंमतीच्या दुधाचें उत्पादन करण्यांत आलें

ह्या आंकडेवारींत मध्यम वर्गाच्या प्राप्तीचे सरासरीचे आकडे बरेच उद्बोधक वाटतात. वकील वर्गाची सरासरी अधिक पडल्याचें कित्येक वकिलांनाहि आश्चर्य वाटेल. नवीन नवीन कायदे आणि आहे त्या उत्पन्नांत वाटा मिळविण्यासाठी होणारे कायदेशीर प्रयत्न ह्यामुळें कज्जेदलाली वाढली असली पाहिजे. वकील वर्ग हा अनुत्पादक म्हणून गणण्याची पद्धत पडली आहे. पण, त्याच वर्गाची प्राप्तीची सरासरी अधिक आहे हें लक्षांत घेण्यासारखें आहे. डॉक्टर वर्गाची चलती खराब आणि अपुरें अन्न ह्यांतून उद्भवलेली दिसते. शिक्षकांचा वर्ग मात्र आर्थिक दृष्ट्या भरभराटलेला दिसत नाहीं. त्याचीं कारणें शोधण्यास फारसें खोलांत जाण्याची जरूरि नाहीं.


## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. COM., C. A. I. I. B. मॅनेजर

## दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई, स्थापन १९११

तारेचा पत्ता : फार्मर बँक टे. नं. २५४६१ | पोस्ट बॉक्स नं. ४७२

चेअरमनः–श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. | ४८,८५,२०० |
| गंगाजळी फंड | रु. | ३९,४८,७०० |
| ठेवी | रु. | ६,९२,८४,९०० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,८०,४९,८०० |

### १५ जिल्ह्यांत ६२ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

## साखर कारखान्यांचें उत्पादन

भारतास साखर उत्पादन करणाऱ्या देशांत बरेंच वरचें स्थान आहे. १९३२ सालीं साखरेच्या धंद्यास संरक्षण देण्यांत आलें, तेव्हां त्याच्या वाढीस खरा प्रारंभ झाला. १९३२ सालीं सबंध भारतांत फक्त ३१ साखर कारखाने होते व त्यांचें उत्पादन १,५८,००० टन होतें. १९३२–३३ मध्यें साखर कारखान्यांची संख्या ५६ झाली, १९३३–३४ मध्यें ती १११ झाली, १९३४–३५ मध्यें ती १२८ झाली आणि १९३५–३६ मध्यें ती १३५ झाली. १९५०–५१ अखेर भारतांत ११,१५,००० टन साखर उत्पादन करणारे १३९ कारखाने होते.

१९३९–४० सालीं सर्वांत ज्यास्त म्हणजे १२.०७ लक्ष टन उत्पादन झालें. साखरेचे साठे वाढले, त्यामुळें १९४०–४१ मध्यें ते १०.४६ लक्ष टनांवर उतरलें. उत्पादनांतील कपातीमुळें उसाच्या किंमतीवर परिणाम होऊन, उसाचा पुरवठा अपुरा पडून उत्पादन आणखी घटलें. गेल्या दोन तीन वर्षांत साखरेचें उत्पादन सुधारत गेलें आहे.

### कारखान्यांची राज्यवार वांटणी

साखर कारखान्यांची राज्यवार वांटणी खालीं दिली आहे. ६९.१% कारखाने उत्तर प्रदेश व बिहार ह्यांत आहेत. मुंबई वगैरे ठिकाणीं आतां उत्पादन वाढत चाललें आहे. (खालील आकडे १९४९–५० चे आहेत.)

| राज्य | कारखान्यांची संख्या | % | साखरेचें उत्पादन | % |
|---|---|---|---|---|
| बिहार | ३० | २१.६ | २,२२,००० | २२ ७ |
| मुंबई | १४ | १०.१ | १,११,००० | ११.४ |
| पंजाब | १ | .७ | ९,००० | .९ |
| मद्रास | ११ | ७.९ | ५९,००० | ६.१ |
| ओरिसा | २ | १.४ | २,००० | .२ |
| उत्तर प्रदेश | ६६ | ४७.५ | ५,०८,००० | ५२.१ |
| प. बंगाल व आसाम | १ | .७ | ३,००० | .३ |
| राज्य प्रमुखांचीं व इतर राज्यें | १४ | १०.१ | ६१,००० | ६.३ |
| एकूण | १३९ | १०० | ९,७५,००० | १०० |

### उसाची लागवड व उत्पादन

भारतांतील साखर उसापासून बनविली जाते, त्यामुळें उसाच्या पुरवठ्यावरच उत्पादन अवलंबून रहातें. १८८४–८५ मध्यें भारतांत १३ लक्ष एकर जमिनींत उसाची लागवड झालेली होती; १९३६–३७ मध्यें ३८ लक्ष एकर जमीन उसाखालीं आली. त्या वर्षाच्या चांगल्या पिकामुळें साखरेचे व गुळाचे भाव घसरले आणि त्याचा परिणाम उसाची लागवड घटण्यांत झाला. १९३९–४० मध्यें ३१ लक्ष एकरांत ऊंस लावला होता. संयुक्त प्रांत आणि बिहार सरकारांनीं उसाच्या किमान किंमती ठरवून दिल्यामुळें लागवडीस प्रोत्साहन मिळून ती ३९ लक्ष एकर झाली. साखरेच्या भरमसाट पुरवठ्यानें बाजारपेठ वाहून जाऊं नये म्हणून संयुक्त प्रांत आणि बिहार ह्यांनीं साखरेच्या उत्पादनास मर्यादा घातली आणि जादा ऊंस त्या वर्षी जाळून नष्ट करण्याची पाळी आली. सहाजिकच, उसाचें उत्पादन त्यामुळें घटलें. पुढें उसाच्या किंमती वाढविल्यानें १९४७–४८ मध्यें परिस्थिति बरीच सुधारली आणि लागवडीचें क्षेत्र ४० लक्ष एकरांपर्यंत गेलें. पुनः तें कमी झालें आणि पुनः वाढलें.

१९५०–५१ च्या मोसमांत साखरेचें उत्पादन ११.१५ लक्ष टन झालें; म्हणजे त्यापूर्वीच्या वर्षापेक्षा ते १२% ज्यास्त झालें. गूळ आणि खांडसारी साखर ह्यांचे कमाल दर बांधून दिले आणि पूर्वीच्या तीन वर्षांच्या सरासरी उत्पादनाच्या १०७% पेक्षा अधिक होणारें उत्पादन खुल्या बाजारांत वाटेल त्या दरानें विकण्यास साखर कारखान्यांना परवानगी दिली त्याचा हा परिणाम होता. १३९ कारखान्यांपैकीं ९२ कारखान्यांनीं असें जादा उत्पादन केलें आणि ५५ ते ६० रु. मण साखर विकून जादा कमाई केली; नियंत्रित दर सुमारें ३२ रु. मण होता.

साखर कारखान्यांतून एकूण सुमारें १,००,००० कामगारांना काम मिळतें. त्यांच्या संख्येशीं उत्पादनाचा कांहींहि संबंध लावतां येत नाहीं, असें उत्पादन व कामगार संख्या ह्यांच्या तुलनात्मक आकड्यांवरून दिसून यतें.

### उत्पादन व उतारा दोन्ही लहान

इतर देशांच्या मानानें भारतांत दर एकरीं उसाचें उत्पादन कमी आहे आणि त्या उसापासून मिळणारा साखरेचा उताराहि लहान आहे. कांहीं देशांचे तुलनात्मक आकडे येथें दिले आहेत.

| देश | दर एकरीं उत्पादन | | साखरेचा उतारा % |
|---|---|---|---|
| | ऊंस (टन) | साखर (टन) | |
| मेक्सिको | १९.५ | १.८२ | ९.२० |
| क्युबा | १७.१ | २.१ | १२.२५ |
| हवाई | ६२.१ | ६.५ | १०.४६ |
| पेरू | ४१.१ | ५.१ | १२.३३ |
| मॉरिशस | १९.६ | २.३७ | १२.०८ |
| जावा | ५६.२ | ६.४४ | ११.४९ |
| जपान–फोर्मोसा | २८.३ | ३.६६ | १२.९३ |
| भारत | १४.७ | १.३९ | ९.५ |

### मिळवलेला व वाटलेला नफा

साखर कारखान्यांनीं मिळविलेल्या नफ्याचे तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत, ते १९३३–३४ ते १९४७–४८ ह्या मुदतींचे आहेत.

| राज्यांतील कारखाने | सरासरी नफा दरसाल दर शेंकडा | सबंध मुदतींचा नफा % |
|---|---|---|
| उत्तर प्रदेश | २५.६५ | ३८४.७५ |
| बिहार | १३.५६ | २०३.४० |
| मुंबई | ४३.७० | ६५५.५० |
| मद्रास | ३५.१३ | ५२६.९१ |
| प. बंगाल | २७.६९ | ४१५.३५ |

१९३३–३४ ते १९३८–३९ ह्या युद्धपूर्व सहा वर्षांत सर्व कारखान्यांनीं सरासरीनें दरसाल ८.८८% डिव्हिडंड दिलें. म्हणजे, सहाहि वर्षांचें मिळून ५३.२८% झालें. १९३९–४० ते १९४४–४५ ह्या युद्धकाळांतील तत्सम आकडे १०.१४% व ६०.८४% असे आहेत. युद्धोत्तर पहिल्या दोन वर्षी डिव्हिडंड सरासरीनें १६.१८% दिलें गेलें. सबंध मुदतीचा वार्षिक सरासरी दर ९.३२% होतो व सबंध मुदतीस मिळून १३९.८०% दर पडतो. मुंबई राज्यांतील कारखान्यांनीं सर्वांत भारी दरानें डिव्हिडंड दिलें, त्याचे खालोखाल उत्तर प्रदेश व बिहार येथील कारखान्यांचा अनुक्रम लागला.

### पू. पाकिस्तानमधील साखरेचे कारखाने

भारत आणि पू. पाकिस्तान ह्या देशांच्या दरम्यान पासपोर्टची पद्धत सुरू करण्यांत आल्यामुळें पू. पाकिस्तानांतील साखरेचा धंदा संकटांत सांपडला आहे. पू. पाकिस्तानांत साखरेचे तीन कारखाने असून त्यांना उसाचा पुरवठा करण्यासाठी १०,००० मजूर उसाच्या मळ्यावर खपत असतात. हे मजूर मुख्यतः प. बंगालमधून काम करण्यास येतात. ऊंस गाळण्याचा हंगाम नोव्हेंबरपासून मार्चपर्यंत चालतो. साखरेचे कारखानदार मुख्यतः हिंदी नागरिक आहेत. पासपोर्टपद्धतीमुळें जरूर तितके मजूर त्यांना मिळत नसल्यामुळें कारखाने सुरू करणें शक्य झालेलें नाहीं. १०,००० मजुरांना त्वरित पासपोर्ट देणें कलकत्त्यामधील पाकिस्तानच्या हायकमिशनरला शक्य होत नाहीं. त्याच्या कचेरींत पासपोर्टसाठी आलेल्या अर्जांचे ढीग साचत आहेत असें समजतें कारखानदारांनीं आपलीं माणसें पाठवून पाकिस्तान-हायकमिशनरला मदत करण्याची तयारी दाखविली आहे. पू. पाकिस्तानांतील साखरेचे कारखाने लवकरांत लवकर चालू करणें पाकिस्तानच्या हिताचें आहे ही गोष्ट कलकत्त्यामधील पाकिस्तानच्या दुय्यम हायकमिशनरनें मान्य केली असून कारखानदारांनीं देऊ केलेल्या मदतीचा शक्य तितका उपयोग करून घेण्याचें आश्वासन दिलें आहे. पू. पाकिस्तानमधील तीन कारखान्यांत मिळून रोज सुमारें ८५,००० मण ऊंस गाळला जातो. पू. पाकिस्तान व पं. बंगाल राजकीय दृष्ट्या वेगळे झालेले असले तरी ह्यांचें आर्थिक जीवन कसें परस्परावलंबी आहे हें वरील हकीकतीवरून पुन्हा एकदां दिसून आलें आहे. राजकीय घडामोडींचा आर्थिक परिणाम पुष्कळदां इतका बलवत्तर होतो कीं आर्थिक सोय-गैरसोय पाहून राजकीय झगडे सोडविण्याची शक्यता पूर्वीपेक्षा अधिक स्पष्टपणें दिसू लागते.

---

### साखरेवरील नवी एक्साइज पट्टी

१९५१–५२ मध्यें उसाचें पीक मोठें आलें त्यामुळें गुळाचें उत्पादन बरेंच वाढलें आणि १९५०–५१ मध्यें गुळाचा भाव १५ ते २० रु. मण होता आणि जानेवारी १९५२ मध्यें १४ रु. मण होता, तो मार्च, १९५२ मध्यें ७ रु. मण झाला त्या कारणानें, बऱ्याच उसाचा विनियोग गुळ ऐवजीं साखरेच्या उत्पादनाकडे झाला. कित्येक साखर कारखाने एप्रिलमध्यें बंद व्हावयाचे, ते जुलैपर्यंत साखर करीत चालू राहिले. एकूण उत्पादन १५ लक्ष टन झालें. १९५०–५१ चा शिलकी साठा धरून १७ लक्ष टन साखर गिऱ्हाइकांना उपलब्ध झाली. परंतु १२ लक्ष टन साखर फक्त खपून ऑक्टोबर १९५२ अखेर नियंत्रित दराची ५ लक्ष टन साखर शिलक राहिली. सर्व गोष्टी लक्षांत घेऊन, मध्यवर्ती सरकारनें साखर कारखानदारांनीं उसकऱ्यांस द्यावयाची किमान किंमत दर मणास १ रु. ५ आ. निश्चित केली; १९५१-५२ च्या पिकास ती १ रु. १२ आ. होती. सहाजीकच, साखरेची किंमतहि उतरण्याची अपेक्षा जनता करणार. परंतु, १९५१-५२चा शिलकी साठा संपण्यास एप्रिल, १९५३ उजाडेल आणि उतरलेल्या दराचा फायदा तोंपर्यंत मिळूं शकणार नाहीं. म्हणून, मागच्या मोसमाच्या साखरेच्या किंमतींत घट करावी आणि त्यांत होणारें नुकसान भरून काढावें ह्यासाठी दर मणीं १ रु. किंवा दर हंड्रेडवेटला १ रु. ६ आ. जादा एक्साइज ड्यूटी बसविणारें बिल पार्लमेंटांत मांडण्यांत आलें आहे. सध्याच्या शिलकी साखरेच्या विक्रीमुळें होणारें नुकसान भरून आल्यावर नव्या उत्पन्नांतून साखरेच्या निर्गतीस सहाय्य करण्यांत येईल. त्यामुळें, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंत हिंदी साखरेस स्पर्धा करतां येईल.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एम. जोशी
मॅनेजर.

# पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

तारेचा पत्ता:—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

## संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें; पिकाच्या रोगांवरील औषधें; पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या नियमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळांचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

### गृहशास्त्राचें शिक्षण देणाऱ्या संस्था

अमेरिकेंत होम डेमॉन्स्ट्रेशन एजंट ह्या नांवाची एक संघटना आहे. ह्या संघटनेंत ३,५०० तरुणी असून त्यांचें काम घरोघरीं जाऊन गृहिणींना गृहशास्त्राचें शिक्षण देण्याचें आहे. गृहरचना मंडळांची एकूण संख्या सुमारें ६०,००० असून त्यांत ठिकठिकाणचे ५ लाख स्थानिक कार्यकर्ते स्वयंसेवक म्हणून काम करीत आहेत. ह्या कार्यकर्त्यांनीं अवघ्या एका वर्षांत १५ लक्ष कुटुंबांना आहारांत सुधारणा करण्याच्या कामांत मदत केली आहे. १० लक्ष कुटुंबांना फळफळावळ टिकविण्याच्या कलेची माहिती करून दिली. १० लक्ष कुटुंबांना अन्न गोठविण्याच्या पद्धति समजावून सांगितल्या आणि २० लक्ष कुटुंबांना घरचे कपडे शिवण्यास शिकविलें. ३ लक्ष शेतावरील घरें बांधण्यासाठीं अगर तीं सुधारण्यासाठीं योजना तयार केल्या. ५ लक्ष कुटुंबांना घरें सुशोभित करण्याचे धडे दिले आणि ५ लक्ष कुटुंबांना घराभोंवताली बागबगीचा कसा असावा तें समजावून दिलें. ह्याशिवाय बालसंगोपन, गृहसौख्य, इत्यादि अनेक बाबतींत हजारों कुटुंबांना त्यांनीं सल्ला दिला. करमणुकीचे कार्यक्रम, ग्रामीण सभागृहें, ग्रंथालयें, इत्यादि योजनाहि त्यांनीं यशस्वी करून दाखविल्या. अशा प्रकारच्या संस्था आणि त्या करीत असलेलें कार्य ह्यांच्याकडे सामान्यपणें लक्ष जात नाहीं. परंतु कोणत्याहि राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेंत घरांतील अर्थशास्त्राला चटकन् न कळणारें पण निश्चित असें महत्त्व आहे. अर्थशास्त्राची मूळ कल्पनाच घराच्या अर्थव्यवहारांशीं निगडित आहे. भारतासारख्या गरीब राष्ट्रांत तर टापटिपीनें पण काटकसरीनें संसार करणाऱ्या घरांची अतिशय आवश्यकता आहे. बचतयोजना यशस्वी होण्यासाठींसुद्धां वरील प्रकारच्या शिक्षणाची फार जरूरी आहे, ह्यांत शंका नाहीं.

---

### राजस्थानांतील लोंकरीचा धंदा

राज्यांतील मेंढ्या पाळण्याचा आणि लोंकरीचा धंदा वाढीला लावण्यासाठी राजस्थान सरकारनें १५ सभासदांचें एक बोर्ड नेमलें आहे. राजस्थानच्या अर्थव्यवस्थेंत लोंकरीच्या उत्पादनाला प्राधान्य असल्यामुळें तें उत्पादन वाढविण्यासाठी बोर्डानें उपाय सुचवावयाचे आहेत. त्याशिवाय मेंढ्यांसाठी कुरणें राखणें, त्यांची लोंकर कातरणें, तिची वर्गवारी करणें इत्यादी बाबतींतही बोर्डानें लक्ष घालावयाचें आहे. लोंकरीला चांगली बाजारपेठ मिळावी म्हणूनहि सरकार सूचनांचा स्वीकार करील. बोर्डावर ६ सरकारी सभासद आणि ९ बिन सरकारी सभासद आहेत. त्यांत एक सभासद अ. भा. चरखा संघाचा आहे. राज्याचे उद्योगमंत्री बोर्डाचे अध्यक्ष आहेत आणि एक तज्ज्ञ सरकारी अधिकारी चिटणीस आहेत. चिटणीस, डॉ. नारायण हे ऑस्ट्रेलिआला जाऊन लोंकरीच्या उत्पादनासाठी उत्तम प्रतीच्या मेंढ्यांची निपज कशी करावी हें शिकून आलेले आहेत. कोलंबो योजनेप्रमाणें ऑस्ट्रेलिआ भारताला जी तांत्रिक मदत करणार आहे, तींत तज्ज्ञांच्या शिक्षणाचाहि अंतर्भाव करण्यांत आलेला आहे. डॉ. नारायण हे ह्याच योजनेखालीं ६ महिने शिक्षण घेऊन आले आहेत. ह्या वर्षी राजस्थानमधून ४०,६०० मेंढ्या आणि १·२२ कोटी पौंड लोंकर परदेशांत निर्यात करण्यांत आली. लोंकरीची किंमत सुमारें ३ कोटी रुपये झाली. मेंढ्यांच्या निर्यातींत गेल्या वर्षींपेक्षा वाढ झालेली दिसत नाहीं. लोंकरीच्या निर्यातींत मात्र २७ टक्के घट झाल्याचें आढळून आलें आहे. निर्यातींत घट होण्यास दोन कारणें झालीं. एक तर भारतानें लोंकरीच्या निर्यातीवर बंधनें घातलीं, त्याच बरोबर इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत लोंकरीला जी मागणी होती ती कमी झाली.


**SAVE to help yourself and the NATION**

WITH THE



HOME SAFE

THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
*Branches:* Dadar, Mahim, Poona & Belgaum


---

**भारताची इराणला देणगी**—भारताच्या शिक्षण-खात्यातर्फे इराणला १२० पुस्तकें भेटीदाखल देण्यांत आलीं आहेत. ह्या पुस्तकांत प्राचीन व अर्वाचीन भारतीय संस्कृति आणि कला ह्या विषयावरील पुस्तकांचा समावेश करण्यांत आला आहे. ह्याप्रसंगीं भाषण करतांना भारताचे इराणमधील वकील म्हणाले कीं अंजठा येथील चित्रांवरून इराणमध्यें भारताचा वकील २,००० वर्षांपूर्वी होता असें दिसतें.

**पाकिस्तानकडे भारतीय बोलपटांची निर्यात**—फेब्रुआरी १९५१ ते ७ ऑगस्ट १९५२ पर्यंत भारतानें पाकिस्तानला ४३,५१,८३१ रुपये किंमतीचे बोलपट निर्यात केले; ह्याच कालांत पाकिस्ताननें भारताला ३७,१३३ रुपये किंमतीचे बोलपट निर्यात केले, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. पाकिस्ताननें भारतीय बोलपटांवर बंदी घातलेली नाहीं, असेंही सांगण्यांत आलें.

---





आजच्या कांहींशा असुरक्षित परिस्थितींत आपल्या
**मौल्यवान् वस्तू**
डेक्कन जिमखाना, पुणें येथील आमच्या
**सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्यें**
अगत्य ठेवा.

# पुण्यांतील बँकिंग प्रदर्शन व व्याख्यानमाला

रविवार ता. ३० नोव्हेंबर व सोमवार ता. १ डिसेंबर रोजीं पुणें येथें, पुणें सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत होणाऱ्या वरील कार्यक्रमाची तयारी पुरी होत आली आहे. बँकिंग प्रदर्शन हा कुतूहलाचा विषय झाला होता. परंतु हें प्रदर्शन प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज त्याच्या मागील कल्पकतेची कल्पना येणार नाहीं. बँकिंगमधील आवश्यक त्या पतपत्रिका, जाहिराती, नकाशे, तक्ते, कचेऱ्यांत वापरावयाचीं यांत्रिक साहित्यें, मौल्यवान् जिनसा ठेवण्याच्या सोई, आकर्षक पोस्टर्स, इत्यादींचें दर्शन ह्या प्रदर्शनांत होणार आहे. प्रदर्शन अत्यंत आकर्षक रीतीनें सजवण्यांत येत आहे. व्याख्यानांचा कार्यक्रम प्रसिद्ध झालेलाच आहे. श्री. सावकार ह्यांच्या व्याख्यानाचे दिवशीं प्रि. धनंजयराव गाडगीळ हे अध्यक्षस्थान स्वीकारणार असून समारोप करणार आहेत. शेठ प्राणलाल देवकरण नानजी ह्यांच्या हस्तें प्रसिद्ध व्हावयाची "बँका-काल, आज व उद्यां" ही सुमारें १०० पृष्ठांची पुस्तिका श्री. श्री वा. काळे, संपादक 'अर्थ' ह्यांच्या मार्गदर्शनाखालीं तयार होत आहे. बँकिंग क्षेत्रांत येता रविवार-सोमवार संस्मरणीय ठरेल, असें उत्साही वातावरणावरून दिसून येतं. पुण्याबाहेरील अनेक बँकांचे संचालक व व्यवस्थापक ह्यांनीं उपस्थित होणार असल्याचें कळविलें आहे. बँकिंगशं संबधित अशा सर्व लोकांनीं ह्या अपूर्व प्रसंगाचें वैशिष्ट्य लक्षांत घेऊन त्यांत सहभागी व्हावें, हें उचितच आहे. "अर्था" नें बँकिंगविषयक प्रश्नांस वेळोवेळ चालना देऊन इष्ट तें वळण लावण्याचा प्रयत्न केला असल्यानें, ह्या उपक्रमाचें स्वागत करण्यास आम्हांस विशेष आनंद होत आहे.

संपादक

---

**मध्य-प्रदेशांतील नवें हवेचें ठिकाण**—मध्य-प्रदेशांती अमरकंटक हें पवित्र ठिकाण नर्मदेचें उगमस्थान म्हणून प्रसि आहे. हें ठिकाण आरोग्यप्रद वसाहत म्हणून विकसित करण्या मध्य-प्रदेश सरकारचा मनोदय आहे, असें समजतें.

**भारताचा नवा पोलादाचा कारखाना**—भारत सरक काढणार असलेल्या नव्या पोलादाच्या कारखान्याच्या जागेसा ओरिसा राज्याची निवड करील असें समजतें. भारतीय सरकार प्रतिनिधी आणि एक जपानी उद्योगपति हे सध्या वॉशिंग्टन ये जागतिक बँकेच्या प्रतिनिधींशीं संकल्पित कारखान्यासंबं वाटाघाटी करीत आहेत.


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :


ब्रँच सेक्रेटरी.




किर्लोस्कर

पॉवरवर चालणारे

वसंत नं. ३ चरक





"शरद चरक"

उसाचे चरक

अधिक माहिती मागवा.

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी



दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००

जमा झालेलें भांडवल रु. ७,१९,४८५

खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

## बार्शी येथें उत्साहपूर्वक कार्यक्रम

बार्शी सेंट्रल को. बँक लि. व बार्शी तालुका को. सु. युनियन व सामील सोसायट्यांतर्फे सर्व सहकारी संस्थांचे कार्यकर्ते व सभासद यांनीं बार्शी येथें मोठ्या सहकार्यानें व उत्साहानें सहकारी दिन साजरा केला. सकाळीं ठीक ८–३० वाजतां सडा-संमार्जन, रांगोळी वगैरे घालून सजविलेल्या बँकेच्या भव्य इमारतींत चौघडा, सनई, वगैरे वाद्यें वाजून बँकेचे चेअरमन श्रीयुत माधवराव विश्वरूपे वकील यांचे हस्तें आंतर–राष्ट्रीय ध्वज उभारण्यांत येऊन त्यास वंदन करण्याचा कार्यक्रम झाला. दुपारीं ४ वाजतां बँकेच्या कै. भाऊसाहेब साने मेमोरियल हॉलमध्यें सभा घेण्यांत आली. सभेचे अध्यक्ष श्री. विश्वरूपे वकील, यांनीं आजच्या सहकारी दिनाचें महत्त्व, त्याचप्रमाणें सध्याचें भारतीय स्वराज्य सरकार सहकारी चळवळीस मानाचें स्थान कसें देत आहे याची थोडक्यांत माहिती देऊन, आंतर-राष्ट्रीय संघाचे मार्फत आलेला संदेश वाचून दाखविला. यानंतर सहकारी संस्थांच्या कार्याचा आढावा व पुढील कार्याची दिशा कशी असावी, कार्यांत येणाऱ्या अडचणी व चुका कशा सुधाराव्या व चळवळ कशी यशस्वी करावी यावर बँकेचे माजी चेअरमन श्री. काळे व मुंबई स्टेटमध्यें सहकारी कार्यकर्ते म्हणून प्रसिद्ध असे वयोवृद्ध व अनुभवी सहकारी पुढारी श्रीयुत भाऊराव साने, वकील यांचें सुश्राव्य व विचारपरिप्लुत असें भाषण झालें. यानंतर येथें झालेल्या सेक्रेटरीवर्गाची माहिती सुपरवायझर श्री. पाटील यांनीं निवेदन केली व या वर्गांत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांस माननीय अध्यक्षांचे हस्तें प्रमाणपत्रें देण्यांत आलीं. रात्रीं ८–३० ते १० 'सहकार' या विषयावर बँकेचे स्टाफपैकी श्री. देशपांडे यांचे सुश्राव्य कीर्तनाचा अभिनव कार्यक्रम झाला. रात्रौ १० ते ११ बार्शीचे सुप्रसिद्ध गवई वासुदेवराव तांबडे यांचें गायन झालें व पानसुपारी होऊन सहकारी दिनाचा कार्यक्रम समाप्त झाला.

---

## कोरेगांव येथें 'सहकारा'वर चर्चा

कोरेगांव-माण तालुका सहकारी खरेदी–विक्री सोसायटी आणि कोरेगांव पीपल्स सहकारी बँक यांच्या विद्यमानें सहकारी दिन पीपल्स बँकेच्या सभागृहांत साजरा करण्यांत आला. हा समारंभ कोरेगांव येथील मुंबई विधानसभेचे तरुण आमदार श्री. शंकरराव घारगे यांचे अध्यक्षतेखालीं झाला. श्री. वामनराव पाटील, मुंबई राज्य सहकारी बँकेच्या कोरेगांव शाखेचे इन्स्पेक्टर श्री. खंडागळे, श्री. जोशी आणि पीपल्स बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. शंकरराव बोकील यांचीं 'सहकार' या विषयावर विविध दृष्टिकोणांतून भाषणें झालीं. अध्यक्षांनीं सहकारी तत्त्वपालनानें आर्थिक व सामाजिक उन्नति कशी करून घेतां येते हें उदाहरणें देऊन विशद केलें.

---

## विजेचे दर वाढणार !

मुंबई–पुणें विभागास वीज पुरविणाऱ्या टाटा कंपन्या, त्या आकारीत असलेल्या दरांची छाननी करणार आहेत. यंत्रसामुग्री बदलावी लागते. तिचा खर्च वाढला असून तीं चालविणेंहि अधिक खर्चाचें झालें आहे. ट्रॉम्बे येथील बाष्पशक्तीचें वीजकेंद्र सुरू झालें, म्हणजे कंपन्यांच्या पाण्याच्या शक्तीवर चालणाऱ्या वीजकेंद्रांच्या उत्पादनखर्चापेक्षा उत्पादन-खर्च वाढेल. युद्धापूर्वीच्याच अल्पदरानें टाटा कंपन्या अजूनहि वीज पुरवीत आहेत आणि त्या दरांची पुनर्रचना करण्याची वेळ आली आहे, असें त्या कंपन्यांचें म्हणणें आहे.


## महाराष्ट्र सहकारी विद्यालय, पुणें

या विद्यालयाचे वर्ग ता. २ जानेवारी १९५३ पासून नं. ५ बैरामजी जिजीभाई रोड, पुणें १, येथें सुरू होणार आहेत. या विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असिस्टंट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, खरेदी–विक्री संघाचे मॅनेजर व विविध कार्यकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी या दर्जाच्या नोकरवर्गास लागणारें शिक्षण देण्यांत येतें. हा अभ्यासक्रम पुरा करून "को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा" मिळवणाऱ्यांना सहकारी खात्यामध्यें नोकरीसाठीं विशेष पसंति देण्यांत येते. मॅट्रिक अगर तत्सम परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांना व सहकारी संस्था व खातें येथील नोकरवर्गास प्रवेश दिला जातो. उमेदवारांनीं दिनांक १५ डिसेंबर १९५२ च्या आंत अर्ज करावे.

वरील तारखेनंतर अर्ज आल्यास जर जागा शिल्लक असतील तरच त्या अर्जांचा विचार केला जाईल; कारण उमेदवारांची संख्या मर्यादित आहे.

एन्. पी. रणभिसे, सुपरिंटेंडेंट.

---

## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

---

दि
# युनायटेड कमर्शिअल बँक लि.
कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६७½ लक्ष रु. |


: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :
जी. डी. बिर्ला (चेअरमन)

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :
बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या संबंध जगभर एजन्सींच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

नेतृत्व—आमची प्राचीन परंपरा



# जर हिप्पालस वारा वहात असेल

इ. स. च्या चौथ्या शतकाच्या सुमारास गुप्त वंशांतील राजांनीं पुरातन पाटलीपुत्र येथें आपली राजधानी स्थापन केली होती त्याच्या पूर्वीपासूनच बलाढ्य आरमार असलेला देश म्हणून भारताची जगभर ख्याति होती.

अति प्राचीन काळीं म्हणजे इ. स. पूर्वी २७५ वर्षे, सम्राट अशोक राज्य करीत असतांना भारतीय खलाशी ९० हूनहि अधिक दिवसांच्या सफरीवर जात व दूरदूरच्या देशांशीं दळणवळण ठेऊन भारतीय माल पर्शिया, अँटिओक व अलेक्झांड्रिया इत्यादि बाजारपेठांना पुरवीत असत.

दक्षिण भारतांतील क्रांगानूर या बंदरांत अरब व रोमन व्यापारी माल खरेदीसाठीं हमेश येत असत. हिप्पालस वारा अनुकूल दिशेनें वहात असेल तर, ४० दिवसांत या बंदरांत पोहोंचतां येतें असें प्लिनी ( एक तत्कालीन खलाशी ) म्हणत असे. हिप्पालस यानें इ. स. ४५ मध्यें शोध लावलेले हे मन्सून वारेच पश्चिमेकडील देशांतून येणाऱ्या व्यापारी गलबतांना भारतांतील "बारीगाझा", "सोपारा" व इतर बंदरांत वाहून आणीत असत.

पूर्वेकडे सुद्धां, भारतीय व्यापारी-गलबतांच्या साहाय्यानें समुद्रावरून मालाची वाहतूक सदैव चालूच होती. पुढें भारताचा प्रभाव जसजसा दूरवर पसरत गेला, तसतसा त्यानें आपली प्राचीन विद्या व संस्कृति यांचा आसपासच्या देशांना लाभ करून दिला.

आज, भारतीय जहाजें पुन्हा महासागरात संचार करूं लागलीं असून तीं देशांतील माल जगांतील व्यापारपेठांत पोंचवीत आहेत. या भारतीय पुनरुज्जीवन कार्यांत टाटा स्टील अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावतें.

दि टाटा आयर्न ॲण्ड स्टील कंपनी लि.

T.I. 3013


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत [illegible] यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनी 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( [illegible] डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.